Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

दृष्टीक्षेपात पंचवार्षिक योजना आणि आर्थिक विकासात १२ व्या पंचवार्षिक योजनेंची भूमिका

प्रा. डॉ. गिऱ्हे सुधाकर शामराव
अर्थशास्त्र विभाग,
मत्स्योदरी महाविद्यालय, तिर्थपुरी,
जि. जालना

समाजाच्या संपूर्ण आर्थिक जीवनाच्या विकासासाठी योजनाबध्द रितीने आणि अत्यंत विचारपूर्वक तयार करणाऱ्या व्यवस्थेला नियोजीत अर्थव्यवस्था असे म्हणतात. अशा स्वरूपाचा आर्थिक विकास घडवून आणने हाच नियोजित अर्थव्यवस्थेचा मुख्य उद्देश असतो. दुसऱ्या महायुध्दातील महाभयंकर संहारामुळे बहुतांश देशाची आर्थिक, राजकिय आणि समाजिक घडी पुर्णत: विस्कटल्या गेली. संपूर्ण देशात मोठ्या प्रमाणार अस्थिरता निर्माण झाली. या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी सर्वच देशांचा सर्वांगिण विकास होण आवश्यक होते. युध्दजन्य परिस्थितीमुळे केवळ साम्यवादी राष्ट्र नव्हे तर भांडवलशाही राष्ट्र देखील राष्ट्राचा आर्थिक विकास घडवून अणण्यासाठी नियोजनाचा अवलंब करू लागली. दुसऱ्या महायुध्दानंतर भारत, ब्राम्हदेश, श्रीलंका या वसाहती असणाऱ्या देशांना स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या आर्थिक विकासासाठी या सर्व देशासमोर नियोजन हाच एकमेव विषय होता. नियोजन म्हणजेच सर्वांगिण विकासाची सर्वसमावेशक स्वरूपी योजना होय.

श्री. एम. विश्वश्वरैया इ. स. १९३४ मध्ये भारतासाठी नियोजित अर्थव्यवस्था (Planned Economy for India) हे पुस्तक लिहून भारतासाठी आर्थिक नियोजनाची आवश्यकता असल्याचे सर्वप्रथम प्रतिपादन केले. त्यानंतर देशातील नवनिर्मित सरकारने १९५० रोजी. कॉग्रेस वर्कींग कमीटीने भारताच्या आर्थिक विकासासाठी योजना आखण्यासाठी नियोजन मंडळ (Planning Commission) नेमण्याची भारत सरकारने शिफारस केली. त्यानुसार तत्कालीन पंतप्रधान मा. श्री. पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षेतेखालील नियोजन मंडळाची स्थापना मार्च १९५० रोजी करण्यात आली.

भारतीय नियोजन प्रमुख उद्देश जनतेच्या सर्वांगिण राहणीमानाचा दर्जा उंचवण्यासाठी विकासाची प्रक्रिया सुरू करून लोकांना अधिक—अधिक समृध्द आणि विविध प्रकारचे जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून देणे आहे.

अकरावी पंचवार्षिक योजना कालावधी १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २०१२ हा होता. १७ ऑक्टोंबर २००६ रोजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या योजना आयोगाच्या पूर्ण बैठकीमध्ये अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या दृष्टीकोन पत्रास (Approach Paper) स्विकृत प्रधान करण्यात आली. १९ डिसेंबर २००७ रोजी राष्ट्रीय विकास परिषदेने आपल्या ५४ व्या सभेमध्ये ११ व्या योजनेला अंतिम मंजूरी दिली. ११ व्या पंचवार्षिक योजनंत मुख्यभर सामाजिक सेवा यावर दिला होता. आर्थिक वृध्दीवर ९.० संकल्पित होता परंतू सध्या ५.६ टक्के साध्य झाला. सार्वजनिक क्षेत्रापैकी सर्वाधिक खर्च सामाजिक सेवा करण्यात आला. १२ वी पंचवार्षिक योजनेची भूमिका काय आहे. हे पाहण्यापूर्वी दृष्टीक्षेपात पंचवार्षिक योजनेपर्यंत. योजना कालावधी, मुख्यभर, प्रतिमान आर्थिक वृध्दीवर संकल्पित आणि साध्य आणि सार्वजनिक क्षेत्रापैकी सर्वाधिक खर्च पुढील प्रमाणे (सारणीने)

दृष्टीक्षेपत पंचवार्षिक योजना

योजना	कालावधी	मुख्य भर	प्रतिमान	आर्थिक वृध्दि दर		सार्व. क्षेत्रापैकी सर्वाधिक खर्च
				संकल्पित टक्के	साध्य टक्के	
I	१९५१—५६	कृषी	हेरॉड—डोमर	२.१	३.६	कृषी व जलसिंचन
II	१९५६—६१	जड व मूलभूत उद्योग	महालनोबिस	४.५	४.१	वाहतूक व दळणवळण
III	१९६१—६६	कृषी व जड उद्योग	महालनोबिस/ एस. चक्रवर्ती	५.६	२.८	वहतुक व दळणवळण
वर्षिक योजना	१९६६—६९	स्वावलंबन	—	५.०	३.७	—
IV	१९६९—७४	स्वावलंबन/स्थैर्यासह वाढ	ॲलन मान व रूद्र/धनंजयराव गाडगीळ	५.७	३.३	कृषी व जलसिंचन
V	१९७४—७८	दारिद्र निर्मूलन व स्वावलंबन	ॲलन व रूद्र/डि. डि.धर	४.४	४.८	उद्योग
सरकती योजना	१९७८—८०	लघु व कुटीर उद्योग व रोजगार निर्मीती	प्रा. लकडावाला	—	—	—
VI	१९८०—८५	दारिद्र—निर्मूलन व रोजगार निर्मीती	ॲलन व अशोक रूद्र	५.२	५.७	ऊर्जा
VII	१९८५—९०	उत्पादक रोजगार निर्मीती	ब्रम्हानंद व वकील	५.०	६.०२	ऊर्जा
वर्षिक योजना	१९९०—९२	—	—	—	०.९	—
VIII	१९९२—९७	मनवी विकास सूचक नियोजन	राव—मनमोहन/LPG	५.६	६.८	ऊर्जा
IX	१९९७—०२	कृषी व ग्रामीण विकास	—	६.५	५.५	ऊर्जा
X	२००२—०७	शिक्षण	—	८.०	७.६	ऊर्जा
XI	२००७—१२	सामाजिक सेवा	—	९.०	५.६	समाजिक सेवा

नोट: पहिल तीन योजनांमध्ये वाढीच्या दराचे लक्ष वा NNP च्या स्वरूपात ठरविण्यात आले होते. चौथ्या योजनेत NDP च्या स्वरूपात, तर त्यानंतर मात्र ते जाडीपीच्या स्वरूपात ठरविण्यात येत आहेत.

वरील तक्यांमध्ये पहिल्या योजनेपासुन ते ११ व्या योजनेपर्यंत योजना, कालावधीत, मुख्यभर, आर्थिकवृध्दी दर, संकल्पित आणि साध्य तसेच सार्वजनिक क्षेत्रापैकी सर्वाधिक खर्च दर्शविला आहे. महाराष्ट्राच्या तिसऱ्या योजनेत सर्वाधिक खर्च कृषी व जलसिंचन क्षेत्रात झाला. चौथ्यापासून आठव्या योजने पर्यंत सर्वाधिक खर्च उर्जा क्षेत्रावर झाला. नवव्या योजनेत सर्वाधिक खर्च जलसिंचन व पुरनियंत्रण या क्षेत्रावर झालेल्या आहे. परंतु बेकारीच्या संख्येत वाढ, आर्थिक शक्तीचे केंद्रीकरणात वाढ, राजकोषीय उपायांना अपयश, कृषी विकासाकडे दुर्लक्ष करण्यात येत

आहे. या प्रमाणे नियोजनात अपयश आलेले आहे. ३१ मार्च २०१२ ला ११ व्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी संपलेला आहे.

१ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१७ प्रमाणे १२ व्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी गठित करण्यात आला. देशातील नियोजन प्रक्रिया पूर्णत: विकेंद्रीत स्वरूपाची असते. राष्ट्रीय विकास परिषदेने (५३ वी बैठक) (दिनांक २७/१२/२०१२) रोजी झालेल्या बैठकीत १२ व्या पंचवार्षिक योजनेंच्या आराखड्यास मंजूरी दिली आकार केंद्रीय योजना रूपये ४७.३९ लक्ष कोटी राज्याची योजना = रूपये ३७.१६ लक्ष कोटी, एकूण योजना आकार = रू. ८४.८६ लक्ष कोटी, जी.डी.पी. वृध्दी = ८.०० टक्के, कृषी वृध्दी दर = ४.० टक्के ग्रॉस कॅपिटल निर्मिती दर = ३७ टक्के (जी.डी.पी. च्या) बचतीचा दर = ३४.१ टक्के (जी.डी.पी. च्या) बाहय रिपोर्ट = २.९ टक्के (जी.डी.पी. च्या) आहे. महाराष्ट्राची १२ वी पंचवार्षिक योजना आकार = रूपये २.७५ लक्ष कोटी, जी.डी.पी. वृध्दी दर = १०.५ टक्के, कृषी =४.० टक्के उद्योग सेवा क्षेत्र = ११ टक्के आहे.

१२ वी पंचवार्षिक योजनेतील महत्वाच्या बाबी:

अ) योजनेचा आकार आणि आर्थिक वृध्दी दर :

१२ व्या पंचवार्षिक योजनेचा आकार जी.डी.पी. च्या १३.११ टक्के असेल ११ व्या योजनेचा आर्थिक आकार जी.डी.पी. च्या १४ टक्के इतका होता. आर्थिक वृध्दीदर एकूण = ९ टक्के, कृषी = ४ टक्के, उद्योग = ९.६ टक्के, सेवा १०.१ टक्के उत्पादन क्षेत्रात १२ ते १४ टक्के वृध्दी दर अपेक्षित करण्यात आलेला आहे.

ब) अनुदान (सबसीडी) आणि जी.डी.पी. (Gross Domestic Product) :-

१२ व्या पंचवार्षिक योजनेत इंधन, अन्न आणि खत करिता. सबसिडीचे प्रमाण जी.डी.पी च्या १२ टक्के करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. ११ व्या पंचवार्षिक योजनेत हे प्रमाण जी.डी. पी. १.६ टक्के इतके होते. देशाच्या जी.डी.पी. मध्ये १७६ लाख कोटीपर्यंत वाढ होईल असे गृहित धरण्यात आले आहे. सन २०११—२०१२ ते २०१६ ते २०१७ या ५ वर्षाच्या कालावधील देशाच्या जी.डी.पी. सरासरी रूपये १३० लाख कोटी इतका राहील. असे गृहित धरल्यास १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या आर्थिक आकार रूपये ३६.९० लाख कोटी इतका होता याचाच अर्थ असा की १२ व्या पंचवार्षिक योजनेचा आकार दुप्पट राहील असा अंदाज आहे.

क) सामाजिक क्षेत्र, संरक्षण आणि पायाभूत सुविधा: —

शिक्षण, आरोग्य अशा घटकांच्या सामाजिक क्षेत्रात समावेश असतो. पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी दरवर्षी १.५ टक्के आर्थिक वाढ प्रस्तावित करण्यात आलेली आहे. १२ व्या पंचवार्षिक योजनेत. आरोग्य सेवेवर जी.डी.पी. च्या २.५ टक्के इतका खर्च केला जाणार आहे. सद्य:स्थितीत हा खर्च जी.डी.पी. च्या १.४ टक्के इतका आहे.

संरक्षणावरील खर्च हा ही मोठा खर्च आहे. १२ व्या पंचवार्षिक योजनेंत संरक्षण खर्चात सुध्दा काही प्रमाणात कपात करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. जी.डी.पी. च्या १.५३ टक्के पर्यंत हा खर्च राहील. देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकास करण्यासाठी मजबुत व उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा यासाठी विशष प्राधान्य दिलेले आहे १२ व्या पंचवार्षिक योजनेत पायाभूत सुविधा निर्माण करण्या करीता १ ट्रिलीयन (१०० बिलियन) अमेरिकन डॉलर खर्च केला जाणार आहे. ११ व्या योजनेत या बाबीवद ५०० बिलियन डॉलर खर्च करण्यात आला होता. विशेष ग्रामीण भागात रस्ते विकासा करीता P.P.P. (Public Private Partnership) मॉडेलचा स्विकार करण्यात येईल.

ड) कर उत्पन्न आणि करत्तेर उत्पन्न:—

स्न २०११—२०१२ मध्ये केंद्र शासनाने निव्वळ उत्पन्न (Net Tax Revenue) रूपये ६. ६४ लाख कोटी राहील. अशी अपेक्षा आहे. १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या वर्षात म्हणजेच सन २०१६—१७ मध्ये केंद्र शासनाने निव्वळ कर उत्पन्नात (Net Tax Revenue) रूपये १५.७४ लाख कोटी पर्यंत वाढ होईल असा अंदाज आहे.

भारत सरकारचे सध्या करेत्तर उत्पन्न जी.डी.पी. च्या अंदाजे ०.८७ टक्के आहे. १२ व्या पंचवार्षिक योजनेत २०१६—१७ या उत्पन्नात जी.डी.पी. च्या १.५० टक्के पर्यंत वृध्दी होईल अशी अपेक्षा आहे.

इ) वित्तीय सूट (Fiscal Deficit- राजकोषीय तूट) आणि चालू खात्यातील तूटः—

१२ व्या पंचवार्षिक योजनेत शेवटी २०१६—१७ मध्ये ही तूट जी.डी.पी. च्या ३ टक्के पर्यंत खाली येईल अशी आपेक्षा आहे की सन २०११—१२ राजकोषीय तूट ४.६ टक्के होती.

चलू खात्यावरील तूट म्हणजे दृष्य आणि अदृष्य वस्तूच्या सेवा आयात निर्यात मधील फरक होय. १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या ५ वर्षाच्या कालावधील चालु खात्यावरील तूट जी.डी. पी. च्या २.६ टक्के पर्यंत राहील असे गृहित धरण्यात आले आहे.

ई) केंद्रपुरस्कृत योजना आणि इतर महत्वाच्या बाबीः—

आयोगाचे सदस्य बी.के. चक्रवर्ती यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने अशी शिफारस केले आहे या केंद्रपुरस्कृत योजनांची संख्या १४७ वरून ५१ पर्यंत कमी करण्यात यावी अशी शिफारस केलेली आहे.

तसेच १) आरोग्य दुय्यम आणि तर्शरी आरोग्य पी.पी.पी. मॉडेलचा स्वीकार करणे, २) आय.डी.सी. ची पूर्नबांधनी करणे, ३) महिला आणि बालकांच्या आरोग्यांकडे विशेष लक्ष पुरविणे, ४) उर्जा व्यापारी उर्जा निर्मितीमध्ये प्रतिवर्षी ७ टक्के वाढ करणे. ५) शिक्षण इ.स. २०१७ पर्यंत माध्यमिक शिक्षणाचे सर्वत्रीकरण करणे उच्च शिक्षणामध्ये २० टक्के वाढ करणे, ६) १२ व्या योजनेत १ लाख मेगावॅट वीज निर्मितीचे लक्ष ठेवण्यात आले आहे. (११ व्या योजनेत ५० हजार मेगावॅट विद्युत निर्मिती होईल अशी अपेक्षा आहे.)

फ) उत्तम शासन आणि भ्रष्टाचार निर्मूलन :—

१२ व्या पंचवार्षिक योजनेत स्वतंत्र असा विशेष भर हा उत्तम शासन आणि भ्रष्टाचार निर्मूलन या विषयावर देण्यात आलेला आहे. उत्तम शासन हा विकासाचा पाया आहे. भ्रष्टाचार निर्मूलनासाठी कार्यप्रणाली दिलेली आहे. वस्तू व सेवा वितरणात सुलभता आणि साधन—संप्पतीच्या वितरणामध्ये पारदर्शकता निर्माण करण्याचे नमूद कलेले आहे.

प) राष्ट्रीय पाणी नियोजन :—

पाणी हे जीवन आहे असे म्हटले जाते देशात दिवसें दिवस पाणी समस्या गंभीर रूप धारण करीत आहे. ही बाब विचारात घेऊन जलसंपत्तीवर नियंत्रण करण्याकरीता. जलसंपत्तीने समृध्दीकरण करण्याकरीता राष्ट्रीय नियंत्रक नेमण्याची उल्लेख आहे. भू—गर्भातील पाण्याचा उपसा करण्यावर नियंत्रण करण्यासाठी अधिनियम केले जाार आहे आणि यांची गरज अत्यंत महत्वपूर्ण अशा स्वरूपाची आहे. पाणी अडवा पाण जिरवा, विहिर, तलाव, कुपनलिका, कालवे निर्माण करणे गरजेचे आहे. आज आपण पाहतो महाराष्ट्रात १२३ तालुक्यात दुष्काळ पडल्यामुळे पाणी प्रश्न गंभीर बनला आहे. तरी केंद्रसरकार, राज्यसरकार मदत करीत आहे. यापूर्वी पाण्याचे नियोजन केले असते तर ही समस्या भयावह परिस्थिती निर्माण झाली नसती.

- भारतीय नियोजनातील त्रुटी आणि उपाययोजनाः—

१. बेकारिच्या संख्येत वाढ होत आहे. बेकारीता दुर करण्यासाठी, रोजगारीला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे उच्च पातळीवरील रोजगारात ३ ते ४ टक्के वार्षिक वाढ करणे गरजेचे आहे.
२. दारिद्रय निर्मुलनात अपयश येत आहे देशात आजही ३५ ते ४० टक्के लोक संख्या दारिद्र्यात आहे. दारिद्र्य निर्मूलनासाठी शासनाने १२ व्या पंचवार्षिक योजनेत गठित केलेल्या योजनेचा पुरेपुर वापर करणे आवश्यक आहे.
३. आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण, आर्थिक विषमता दुर करण्यासाठी विविध योजनेत भर देण्यात आलेला नाही. आज आपण पाहतो. जमीनीचा ५० टक्के भाग ३ टक्के लोकांकडे आहे तर ७५ टक्के भाग १० टक्के कुटूंबाजवळ आहे. यामध्ये वाटणी समान करणे आवश्यक आहे.
४. राजकोषीय उपयांना अपयश भारतीय अर्थव्यवस्थेवर सद्यस्थितीत राजकीय नियंत्रण ठेवणे कठिण झाले आहे. करचुकवेपणा, काळापैसा निर्माण होऊन समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे. यावर एक ठोस उपाय योजना करणे आवश्यक आहे.

सारांश:—

एकंदरीत विचार करता १२ व्या पंचवार्षिक योजनेची उचित प्राप्तीची अपेक्षा आहे. या योजनेत पाणी, शिक्षण, शेती, उद्योग, उर्जा, विद्युत निर्मिती, उच्च शिक्षण, महिला आणि बालकांचे आरोग्य यावर भर देण्यात आलेला आहे. कार्यक्षम आणि कार्यपूर्ती तसेच सेवा प्रशासन पंचायत राज, जमीन आणि पाणी प्रश्न सोडविणे महत्वाचे आहे. सामाजिक आणि आर्थिक आधाराची संरचना निर्माण झाली आहे या योजनामुळे अवजड व मूलभूत उद्योगाचा विकास होऊन चालना मिळाली आहे. देशात शिक्षणाचा प्रसार झाला आहे परंतू गरीबी दुर करणे, आर्थिक विषमता दुर करणे, आर्थिक केंद्रीकरण कमी करणे, अन्नधान्याच्या किंमतीवर नियंत्रण ठेऊन सामाजिक न्याय प्रस्थापित करणे. तसेच शेतीच्या विकासातून अर्थव्यवस्थेचा विकास साध्य करणे इत्यादी बाबतीत नियोजनकरांना अद्यापही यश प्राप्त झाले नाही हे सत्य नाकरता येत नाही. परंतू १२ वी पंचवार्षिक योजनेतून शासन साध्य करू शकेल अशी अपेक्षा करू या

संदर्भ:—

1) Cenus reports Government Of India 1991 & 2001
2) S. K. Misra And V. K. Puri – Economis of Growth and Development, Himalaya Publishing House, Mumbai.
३) १२दैनिक सकाळ १२ मार्च २०१६
४) भारतीय अर्थव्यवस्था — Rajan Kolambe (MPSC/UPSC)
५) योजना
६) अर्थसंवाद